वाचले -

१) भारत सरकार, श्रम एवं रोजगार मंत्रालय, नई दिल्ली, यांचेकडील राजपत्र क्र.७०९ दिनांक – ०६/१०/२०१६ रोजीची अधिसूचना.

२) दिनांक २५/१०/२०२२ रोजीचा मान्य प्रस्ताव.

==================================================================

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८.
कामगार कल्याण विभाग,
जा. क्र काक/३/ कावि/९५८ /२०२२.
दिनांक - २५/१०/२०२२.

विषय - किमान वेतन दरानुसार ज्या कर्मचा-यांचे एकूण वेतन र.रु.२१,०००/- (अक्षरी र. रु. एकवीस हजार फक्त ) पेक्षा जास्त असल्यास त्यांना ई.एस.आय. लागू नसल्याबाबत....

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागातील विविध विभागामार्फत विविध प्रकारची विकास कामे / सेवा हि निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून कंत्राटदारा मार्फत केली जातात. सदरची कामे करण्यासाठी कंत्राटदारामार्फत कामगारांची नेमणूक केली जाते.

प्रकरणी वाचले क्रमांक १ नुसार ज्या कंत्राटी कामगाराचे एकूण वेतन रक्कम रुपये २१,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एकवीस हजार फक्त) पेक्षा जास्त आहे. अशा कंत्राटी कामगारांना ई.एस.आय. (राज्य कामगार विमा अधिनियम १९५०) नियम ५० नुसार ई.एस.आय. निधी लागू होत नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व कामगारांचे एकूण वेतन रक्कम रुपये २१,०००/- पेक्षा जास्त आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व कंत्राटी कामगारांना ई.एस.आय. निधी लागू होत नाही.

सबब सर्व विभागप्रमुखाना सूचित करण्यात येते कि, आपले विभागातील ज्या कंत्राटद्वाराद्वारे मनुष्यबळाची सेवा उपलब्ध करून घेतली जाते अशा कंत्राटी कामगाराना ई.एस.आय. निधी लागू नसल्याने सदर कंत्राटदाराना माहे ऑक्टोबर २०२२ पासून ई.एस.आय. ची रक्कम अदा करू नये तसेच कंत्राटदाराने त्यांचे कामगारांची ई.एस.आय. वर्गणीची रक्कम संबधित विमा कार्यालयाकडे जमा करू नये. सदर परिपत्रकाचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(प्रदीप जांभळे पाटील)
अतिरिक्त आयुक्त - १
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.

प्रति,
सर्व संबधित विभागप्रमुख,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.